# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 384/2023 दिनांक : 07.10.2023**

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**विमानतळ :–** दिनांक 05.10.2023 रोजी चे सायंकाळी 04.30 ते 05.00 वा. चे दरम्यान, **पिरबुऱ्हाण गल्ली नं.–13 नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा विजबिल वसुली करण्यासाठी गेला असता गल्ली नं –13 मधील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस शिवीगाळ करत शासकीय कामात अडथळा निर्माण करून लोखंडी रॉडने, फावडयाचा दांडा व दगडाने मारहाण करून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी सुनिल बबनराव वाघ, वय 46 वर्षे व्यवसाय नौकरी रा. दरवेश नगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 327/2023 कलम 307, 353, 333, 326, 504, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जाधव, मो.क्रं. 8007580146** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**हिमायतनगर :–** दिनांक 30.09.2023 रोजी 11.30 ते 14.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे शेतात रेणापुर शिवारात ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो पॅशन प्रो कंपनीची मो. सा. क्रमांक एमएच–26/एडब्यु–1382 किंमती 30,000/–रूपयाची शेतात लावुन खालच्या शेतात काम करीत असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सुनील मारोती सुर्यवंशी, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. पळसपुर ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरन 423/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो. क्रं. 7350671239** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**रामतिर्थ :–**दिनांक 03.10.2023 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **साईदीप पेट्रोल पंपा समोर अंडयाचे गाडयावर सार्वजनिक रोडवर मौ. लोहगाव ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे सोबतचे साक्षीदार हे अंडयाचे आमलेट खावुन बिल देवुन परत येत असतांना आरोपीतांनी संगणमत करून तु काल खालेल्या आमलेटचे बिल कमी का दिलास म्हणुन वाद करून फिर्यादीस आरोपीतांनी लोखंडी रॉडने कपाळावर, चाळयावर मारून गंभीर जखमी केले व पाठीत, पोटात व ईतर ठिकाणी फायबर खुर्ची व दगडाने मारहाण केले. साक्षीदार हे भांडण सोडविण्यास आले असता त्यांना पण मारहाण केली आहे. व जिवे मारण्याची धमकी दिली आहे. वगैरे **फिर्यादी मारोती पंढरी शेळके, वय 29 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कुंभारगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरन 180/2023 कलम 326, 324, 323, 504, 506, 427, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/शेख, मो. नं. 9823206916** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ

**1)वजिराबाद :–** सन 2014 **ते** दि. 10.04.2023 चे दरम्यान, **फिर्यादी बाईचे सासरी नालंदानगर पुर्णा जि. परभणी** ह. **मु. हस्सापुर वाघीरोड ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस, तु आम्हाला पसंत नाहीस, तुझे माहेरहुन 10,00,000/–रूपये घेवुन ये असे म्हणुन वेळोवेळी थापड बुक्यांनी मारहाण व शिवीगाळ करून तिचा शारिरीक व माणसीक छळ करून, चारीत्र्यावर संशय घेवुन, उपाशी पोटी ठेवुन घरातुन हाकलुन दिले. वगैरे **फिर्यादी** 31 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 441/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/412 कानगुलवार, मो.क्रं. 8329585283** हे करीत आहेत.

**2)मरखेल :–** सन 2022 पासुन ते आज पावेतो, **फिर्यादीचे घरी विदयानगर कॉलनी बिदर ह. मु. देवापुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस मारहाण करून 15,00,000/–रूपये घेवुन ये म्हणुन मारहाण करून तिचा शारिरीक व माणसीक छळ करून, जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 28 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 195/2023 कलम 498(अ), 323, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2505 कदम, मो.क्रं. 9923606729** हे करीत आहेत.

## 5)सदोष मनुष्यवध :–

**विमानतळ :–** दि. 02.10.2023 रोजी चे 09.30 ते 10.30 वा. चे दरम्यान, **गौतमनगर सांगवी नांदेड येथे,** यातील मयत नामे **गणेश मारोती कांबळे, वय 30 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गौतमनगर सांगवी नांदेड** हा ललीताबाईला दिलेले पैसे मागणी करत असतांना फिर्यादीच्या गल्लीतील आमरीन उर्फ आम्रपाली ही तिथे येवुन मयतास तुझी काय औकात आहे म्हणुन तु पैसे का मागतोस, तु जा येथुन असे म्हणुन तीने मयताची गच्ची धरून जोरात ढकलुन दिलेने खाली पडुन मार लागुन मरण पावला. वैगेरे **फिर्यादी ज्योती गणेश कांबळे, वय 30 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गौतमनगर सांवगी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. 324/2023 कलम 304 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गोंड, मो.क्र. 7972560742** हे करीत आहेत

## 6)अपघात :–

**माळाकोळी :–** दि. 03.10.2023 रोजी चे रात्री 08.30 वा. चे सुमारास, **खेडकरवाडी जवळ असलेल्या जोड पोलाजवळ नॅशनल हायवे रोडवर ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील मयत नामे **सुर्यकांत नारायण उंडाळे, वय 35 वर्षे, रा. लोहा ता. लोहा जि. नांदेड** यास यातील नमुद आरोपीने आपली मो सा एमएच–24/यु–914 ही हयगय व निष्काळजीपणे चालवुन मयताचे मो सा क्रं एमएच–26/बीएम–2968 ला धडक देवुन गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला. वैगेरे **फिर्यादी विश्नाथ नारायण उंडाडे, वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. मोंढा परिसर लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं. 150/2023 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आडे, मो.क्र. 9970125563** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**वजिराबाद :–**दिनांक 06.10.2023 रोजी 17.10 वा. चे सुमारास, **बसस्थानक ओव्हर ब्रिजचे खाली नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी पिस्टल किंमती 20,000/–रूपयाचे ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी** पोना/**2085, विजयकुमार कुरमया नंदे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 442/2023 कलम 7/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** सपोनि/**श्री मंठाळे, मो.क्र. 8237703777** हे करीत आहेत.

## 8)गळफास घेवुन आत्महत्या :–

**मनाठा :–**दिनांक 04.10.2023 रोजी चे 22.00 ते 05.10.2023 चे 07.00 वा. चे दरम्यान, **मौ. चोरंबा खु. ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे आनंदराव शामराव वागतकर, वय 33 वर्षे, व्यवसाय शेती रा. चोरंबा खु. ता. हदगाव जि. नांदेड,** यांनी स्वताचे शेतीचे सततचे नापीकीमुळे व बँक कर्जामुळे स्वताचे राहाते घरी पत्राचे खाली लाकडी आडुला दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केला आहे. वगैरे **खबर देणार आणिताबाई आनंदराव वागतकर, वय 32 वर्षे, व्यवसाय घरकाम व सरपंच रा. पाटोदा खु ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मनाठा** आ. मृ. **22/2023** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2123 गिरी, मो.नं. 9604822123** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड